**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा , नवी मुंबई येथे दिनांक २९|०९|२०२२ रोजी Maha IT Programmers सोबत आस्थापना विषयक, मनपालेप व पंचायत राज संस्था बाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

दिनांक २९/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा नवी मुंबई यांच्या दालनात मा. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली संचालनालयाच्या MAINS प्रणाली तसेच MIS विवरणपत्रांचे कामकाजासंदर्भात आढावा बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीसाठी खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीम. राजश्री टोकळ | उप संचालक, संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा नवी मुंबई |
| २. | श्री.दत्तात्रय पाथरुट | उपसंचालक, (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा रायगड भवन, नवी मुंबई |
| ३. | श्री. बाळासाहेब तट्टु | सहा.संचालक, (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा रायगड भवन, नवी मुंबई |
| ४. | श्रीम. स्वाती कुलकर्णी | सलेपअ - पंरास. |
| ५. | श्रीम. रेखा वसावे | सलेपअ - आस्थापना |
| ६. | श्री. अनंत पारखे | प्रोजेक्ट मॅनेजर (Project Manager MahIT) |
| ७. | श्री. प्रतिक जोंधळे | प्रोग्रॅमर |
| ८. | श्रीम.कल्याणी तांबे | प्रोग्रॅमर |

बैठकीत खालीलप्रमाणे विषयांवर चर्चा झाली व त्याअनुषंगाने सुधारणा करणेकरीता सूचना देण्यात आल्या

| अ.क्र. | अडचणीचे स्वरुप | सुचविलेले उपाय |
|---|---|---|
| १. | **संचालनालयाच्या MAINS प्रणालीवरील Application Server ची System Memory Full झाल्यामुळे मेमरी अभावी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे १० अहवाल Upload होण्यास अडचण येत आहे.** | **शासन अधिनस्त सर्व IT Applying Cloud वर स्थलांतरीत करणेच्या सूचना शासन स्तरावरुन प्राप्त झाल्या असून Maha IT मार्फत Cloud Server खरेदीचा प्रस्ताव PIC कमिटीकडे पाठविण्यात आहे. कमिटीकडून सदर प्रस्तवास मान्यता प्राप्त झालेवर MAINS प्रणालीवरील DATA Cloud वर स्थलांतरीत होईल व पुरेशी Memory Space उपलब्ध होईल त्यास सुमारे** |

| | | |
|---|---|---|
| | | एक ते दीड महिन्याचा कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात MAINS प्रणालीवरील काही अनावश्यक DATA Database Server मधून काढून टाकणेविषयी प्रोग्रामर्सशी चर्चा केली. त्यानुसार एक वर्षावरील सर्व Attachment files आणि Draft Audit paras यांच्या images काढून टाकणेविषयी सूचना दिल्या. तसेच L-CAP प्रणालीवरुन परिच्छेद अंतिमत: वगळल्यानंतर त्या संबंधीच्या एक वर्षावरील सर्व Attachment files प्रणालीतून काढून टाकणेच्या सूचना दिल्या<br>व त्यानुसार space उपलब्ध करुन अपुऱ्या Memory मुळे प्रलंबित नमूद १० अहवाल ८-१० दिवसात Upload करुन देणे विषयी प्रोग्रामर्सना सूचना दिल्या. |
| २. | MAINS प्रणालीवरील जिल्हा सूचीमध्ये Mapping मध्ये दुरुस्ती करणेबाबत. | नवी मुंबई महानगरपालिका ही ठाणे जिल्हा अंतर्गत येते. |
| ३. | अंतिम अहवालचे सुशोभीकरण करणेबाबत | Alignment- Justify करणे<br>Table Properties - Auto height Width<br>Auto Numbering करणेबाबत सूचना देण्यात आल्या. |
| ४. | भाग-१ Upgrade करणेबाबत<br>( सन २०१३-१४ पासुन ) | १) पंचायत राज समिती प्रलंबित<br>२) सर्वसाधारण प्रलंबित<br>३) भार-अधिभार प्रकरणे |
| ५. | अंतिम अहवाल तयार करताना जागेची बचत | प्रत्येक परिच्छेदाच्या सुरुवातीला आवश्यक माहिती दोन ओळीतच बसवावी वसुलपात्र व अंतिम अमान्य रक्कम हया दोनच रकमांचे टॅब ठेवावेत |
| ६. | MAINS प्रणालीवरील सुधारणा | Edit Option Forward च्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे ( Simplify)<br>Para summary हा भाग काढून टाकावा. |

| | | |
|---|---|---|
| ७. | New MIS Form | L-cap प्रणालीवरील प्रलंबित परिच्छेदांचे मासिक विवरणपत्र (सोबत नमुना) |
| ८. | Mahalfa वर करावयाच्या सुधारणा | Home page वरील संचालनालयाची माहिती About मध्ये ठेवून त्या जागेवर नवीन सुधारणा व सूचना प्रसिध्द करणे |
| ९. | MAINS प्रणालीमध्ये<br>L-cap Para Status मध्ये Division wise status add करणे | सूचना दिल्या |
| १०. | MAINS प्रणालीत online editor ( paid version ) समाविष्ट करणेबाबत. | NIC कडे उपलब्ध असलेले version (editor) तसेच मार्केटमध्ये उपलब्ध असलेले version यांचा तौलनिक अभ्यास करुन प्रणालीवरील आवश्यक online editor version बाबतची माहिती संचालनालयास सादर करणाच्या सूचना दिल्या. |
| ११. | नगरपालिका/नगरपंचायती यांचा एकत्रित लेखापरीक्षण अहवालाबाबत MAINS प्रणालीवर आवश्यक ते बदल करणे. | सूचना दिल्या |
| १२. | L-cap प्रणालीमधून वगळलेला परिच्छेद MAINS प्रणालीतील भाग -१ मधून आपोआप वगळला गेला पाहिजे. | सूचना दिल्या |

( राजश्री ठोकळ )
उप संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
संचालनालय, नवी मुंबई.